# स्वस्तातली गॉगलची शायनिंग पडेल महागात

## तरुणांनो; शास्त्रोक्त पद्धतीचेच वापरा गॉगल!

✔ सोलापूर/दीपक शिराळकर

तापमानात राज्यात अग्रेसर असलेल्या आपल्या 'शोला'पूरचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. मार्च महिन्यात तापमान साधारण ४० अंशावर गेले आहे. उन्हाचा झळा त्रासदायी वाटू लागल्या आहेत. उन्हापासून संरक्षण मिळविण्याचे प्रयत्नदेखील नागरिकांकडून सुरु झाले आहेत. तप्त उन्हापासून डोळ्यांचे सरंक्षण करण्यासाठी गॉगल वापरण्याचा पर्याय काढला जात आहे. काहीजण शायनिंग म्हणूनदेखील गॉगल घेत आहेत.

तथापि, उन्हापासून संरक्षण होण्यासाठी किंवा मस्त शॉयनिंग म्हणून डोळ्यावर लावायला गॉगल घेत असाल तर थोडे थांबा. विचार करा आणि शास्तोक्त पद्धतीचाच चांगला गॉगल वापरासाठी घ्या. 'सोनेसे कम नहीं, खोया तो गम नहीं' असे जसे नकली दागिन्यांबाबत असते. तसे करु नका. स्वस्तामधील गॉगलीची शायनिंग तुम्हाला महागात पडू शकते.

विशेषत्वे, उन्हापासून डोळे वाचविण्यासाठी किंवा शायनर म्हणून मिरवण्यासाठी तुम्ही अत्यंत हलक्या दर्जाचे, कमी किंमतीचे रस्त्यावर मिळणारे गॉगल घेऊन तुमच्या डोळ्यांचे संरक्षण करण्याऐवजी तुमच्या डोळ्यांना धोका पोचवू शकतो. दक्ष राहा. हे सुंदर जग पाहण्यासाठी आपली दृष्टी आयुष्यभर चांगली राहायला हवी.

उन्हामध्ये डोळ्यांना उन्हाची झळाळी जाणवते. त्यामुळे बरेच लोक उन्हाळ्यात डोळयासाठी गॉगल चा वापर करतात. उन्हात बाहेर फिरत असताना डोळे लाल होतात. तसेच डोळे जळजळ करतात. डोळयांमध्ये कचरा जाण्याची शक्यता असते.त्यामुळे डोळयाला संरक्षण मिळावे म्हणून कुठलीही तपासणी न करता रस्त्यावरील गॉगल विक्री करणाऱ्यांकडून अनेकजण गॉगल खरेदी करतात. गॉगल घेण्यापूर्वी रस्त्यावरून गॉगल घ्यायचा की दुकानातून या गोष्टींचा विचार करा. गॉगल घेताना डॉक्टरांचा सल्ला आवर्जून घ्यायलाच हवा.







"उन्हाळ्यात उत्तम दर्जाचे अल्ट्राव्हायोलेट संरक्षण देणारा १०० टक्के गॉगल वापरा. रस्त्याच्या कडेला मांडलेल्या स्टॉल्सवरुन गॉगल खरेदी करु नका. असे गॉगल्स् डोळ्यांसाठी हानिकारक असतात. ऑप्टिकल ब्रेशन्स, विकृत प्रतिमा आणि संरक्षणापेक्षा जास्त नुकसान होते. १०० टक्के अल्ट्राव्हायोलेट संरक्षण असलेले सन ग्लासेस वापरा. आपल्या डोळ्यांना घातक ठरणारे गॉगल कधीच वापरु नका.

**– डॉ. संतोष आडके**
नेत्ररोगतज्ज्ञ, आडके हॉस्पीटल, सोलापूर

"गॉगल आपल्या डोळ्यांसाठी खूप उपयुक्त वस्तू आहे. जग पाहण्यासाठी डोळे लागतात. गाडी चालवण्यासाठी डोळे महत्त्वाचे ठरतात. उन्हापासून किंवा धुळी पासून संरक्षण मिळविण्यासाठी गॉगलेला महत्वाचे स्थान आहे. गॉगल होय. आयुष्यभर दृष्टी चांगली राहायला हवी. हे सुंदर जग आपले डोळे कायमचे बंद होण्यापर्यंत पाहण्यासाठी दृष्टी पर्यायाने डोळ्यांची काळजी घेणे. चांगल्या प्रतीचेच गॉगलस् वापरा.

**– अल्पेश जव्हेरी**
दत्तगुरु ऑप्टिकल्स, सुराणा मार्केट, सोलापूर

### रस्त्यावरच्या स्टॉलवरचे प्लॅस्टिकचे गॉगल घेताच कशाला?

रस्त्याच्या कडेला शिवाय चौका-चौकात गॉगलचे स्टॉल उन्हाळ्यात दिसून येतात. हे गॉगल प्लॅस्टिकचे बनलेले असतात. खरेदी करायचा असेल तर विचार करून घ्यावा प्लॅस्टिक गॉगलने डोळ्याला आराम मिळत नाही. मोतीबिंदू, काचबिंदू, किंवा दृष्टीदोष निर्माण होतो. त्यामुळे असे गॉगल वापरू नये. कारण सूर्याची आलेली किरणे आपल्या डोळ्यात पसरतात म्हणून डोळ्याला त्रास होतो. डोळे लाल होणे, डोळ्यातून पाणी येणे असे त्रास होऊ शकतात. या गॉगल मध्ये प्लास्टिक घटक असतात डोळ्यांना यामुळे थंड आराम मिळू शकत नाही. या प्लास्टिकच्या ग्लासमुळे डोळ्यांना विपरीत परिणाम होतो. रस्त्यावरील गॉगल कमी पैशात म्हणते ५० ते १०० रुपयात मिळतो. किंमतीवर जाऊ नका. डोळे वाचवा.

### सर्वसाधारणपणे 'अशा' आहेत गॉगलच्या किंमती

बाजारपेठेत व दुकानात चांगल्या चांगल्या ब्रँडचे गॉगल मिळतात. १०० रुपयांपासून ते नऊ हजार रुपयेपर्यंत व यापेक्षाही जास्त किमतीचे बाजारात गॉगल उपलब्ध आहेत. रस्त्यावरील विक्रेते हलक्या कॉलिटीचे गॉगल विकत असतात. ते आकर्षित करणारे गॉगल असतात, स्टायलिश असतात त्याची किंमत ५० ते ६० रुपये असते.

### गॉगल वापराचे 'हे' फायदा घ्या जाणून

- अल्ट्राव्हायोलेट प्रकाशापासून होते संरक्षण
- डोळ्यात कचरा, धूळ जाण्यापासून होतो बचाव
- उन्हाळ्यात डोळे नाहीत होत लाल
- डोळ्यामधील कचकच, डोळे खाजवणे असे होत नाहीत प्रकार
- हयातभर चांगली दृष्टी राहण्यासाठी होते मोठी मदत
- डोळ्याची बुब्बळे तसेच नेत्रपटल राहते खास सुरक्षीत
- थेट वारा लागून डोळ्यातून पाणी येणे वगैरे होत नाहीत प्रकार
- डोळे चिपडणे असा प्रकार थांबण्यास होते मदत
- व्यक्तीमत्व अधिक आकर्षक होण्यास होते खास मदत

### फक्त उन्हाळ्यातच गॉगल वापरणार असाल 'हे' विचारात घ्या

उन्हापासून डोळ्यांचे संरक्षण होण्यासाठी केवळ तुम्ही उन्हाळ्यात गॉगल वापरणार असाल तर ग्रे, ग्रीन ग्लास, ब्राऊन ग्लास, डार्क कलर ग्लास, थंड ब्लॅक ग्लास हे खास स्पेशल आहेत. यापैकी एकाची निवड तुम्ही करु शकता. या ग्लास मधून सूर्याची किरणे आपल्या डोळ्यासमोर येत नाहीत. यामुळे डोळे लाल, डोळ्यातून पाणी याचा त्रास जाणवत नाही.सूर्या संबंधित परिणामातून डोळ्यांचा बचाव होतो. डोळ्यासंदर्भात तुम्हाला भविष्यात अडचण येणार नाही.

### बाजारात उपलब्ध असणारे गॉगलस्चे 'हे' ब्रण्डस्

दुकानात मिळतात चांगल्या दर्जाचे सनग्लास या मेटल आणि प्लास्टिक या डिझाईन गॉगल यामध्ये एव्हिएटर, वेफेअर, क्लब मास्टर, राऊंड, स्क्वेअर असे प्रकारचे या ब्रँडचे दुकानात रेबन, फास्टट्रॅक, आयडी, रिबॉक, गुची, अरमानी, कार्टअर ओकली, पुमा, लॅकऑस्टिक,मायविच,ब्लूबेरी, डेटा असे नानाविध प्रकारचे ब्रँडस् उपलब्ध आहेत.

---

# भाजपची सीरमकडूनही वसुली प्रणिती शिंदे यांचा खळबळजनक आरोप

✔ सोलापूर/प्रतिनिधी

मोदी सरकारने उपकृत केलेल्या कंपन्यांपैकी ८० टक्के कंपन्यांनी भाजपला निवडणूक रोख्यांच्या रुपाने आर्थिक रसद पुरवली. कोविडवरील लस खरेदी करून नागरिकांना टोचली त्या सीरम इन्स्टिट्यूटनेही १०० कोटी रुपयांचे निवडणूक रोखे घेतले, असा खळबळजनक आरोप प्रणिती शिंदे यांनी केला.

लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी भाजपचा उमेदवार जाहीर झाला नसतानाच काँग्रेसच्या संभाव्य उमेदवार मानल्या जाणाऱ्या आमदार प्रणिती शिंदे यांनी मतदारसंघात गावभेटींच्या नावाखाली प्रचार सुरू केला आहे. भाजप व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडताना निवडणूक रोख्यांच्या मुद्यावर त्यांनी मोदी सरकारवर आसूड ओढले.

निवडणूक रोखे योजनेत प्रचंड भ्रष्टाचार झाला असून केंद्रीय तपास यंत्रणांना हाताशी धरून निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून भाजपने हजारो कोटींची वसुली केल्याचा आरोप करीत, आमदार प्रणिती शिंदे यांनी कोव्हिड लस तयार केलेल्या सीरम इन्स्टिट्यूट कंपनीने खरेदी केलेल्या निवडणूक रोख्यांवर भाष्य केले. त्याचवेळी कोव्हिड लशींच्या मात्रा घेतल्यामुळे नंतर लोकांना कोणकोणती दुखणी सुरू झाली, यावर वादग्रस्त भाष्य केले.

त्या म्हणाल्या, मोदी सरकारने उपकृत केलेल्या कंपन्यांपैकी ८० टक्के कंपन्यांनी भाजपला,निवडणूक रोख्यांच्या रूपाने मदत केली. करोना काळात मोदी सरकारने पुण्याच्या सीरम इन्स्टिट्यूट आफ इंडिया कंपनीने तयार केलेल्या कोव्हिड-१९ लशी खरेदी करून त्याच्या दोन-दोन मात्रा लोकांना बळजबरीने टोचल्या. मात्रा टोचून घेतलेल्या लोकांना पंतप्रधान मोदी यांची छबी असलेले प्रमाणपत्रही दिले. लस खरेदी केल्याची परतफेड म्हणून सीरम कंपनीने शंभर कोटींचे निवडणूक रोखे खरेदी केले. यातून मोदी सरकारने हितसंबंध जोपासल्याचा आरोप आमदार प्रणिती शिंदे यांनी केला.

परंतु ही कोव्हिड-१९ मात्रा लोकांचे आयुष्य मारून टाकण्यासाठीच होती की काय, आशी शंका वाटते. कारण ही मात्रा घेतलेल्या असंख्य लोकांना नंतर मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार व अन्य दुखणे सुरू झाले आहेत. त्याचा सार्वत्रिक अनुभव समोर येत असल्याचा दावा त्यांनी केला.

---


# 'इंडिया' आघाडी शिवतीर्थावरून प्रचाराचे रणशिंग फुंकणार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

## ▶▶ शिवतीर्थावर रविवारी इंडियाची एकी दिसणार
## ▶▶ गांधींच्या मंचावर पवार ठाकरेंसह तेजस्वी यादव!











काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वात भारत जोडो न्याय यात्रा मुंबईत मोठ्या उत्साहात दाखल झाली. या यात्रेची समारोपाची सभा रविवारी मुंबईतील शिवतीर्थावर सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या भव्य सभेत इंडिया आघाडीची एकजूट दिसणार आहे. याच सभेत लोकसभा निवडणुकींचे रणशिंग फुंकले जाणार आहे. ही भव्य सभा होण्यापूर्वी उद्या राहुल गांधी यांची मुंबईत 'न्याय संकल्प' पदयात्रा होणार आहे. मणीभवन ते ऑगस्ट क्रांती मैदान अशी ही 'न्याय संकल्प' पदयात्रा असणार आहे.

या सभेला राष्ट्रीय नेते शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, काँग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, झारखंडचे मुख्यमंत्री चंपई सोरेन, बिहार विधानसभा विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव, उत्तर प्रदेश विधानसभा विरोधी पक्षनेते अखिलेश यादव, ज्येष्ठ नेते फारुक अब्दुल्ला, जेष्ठ नेत्या कल्पना सोरेन (माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या पत्नी) आपचे नेते सौरभ भारद्वाज, दीपंकर भट्टाचार्य यांच्यासह इंडियाचे १५ हून अधिक मित्र पक्षाचे प्रमुख नेते सहभागी होणार आहेत.

लोकसभा निवडणुकींची घोषणा झाल्यावर इंडिया आघाडीची पहिली सभा मुंबईत होत आहे. या सभेत लोकसभा निवडणुकींचे रणशिंग फुंकले जाणार आहे.

सभेपूर्वी उद्या राहुल गांधी यांची मुंबईत न्याय संकल्प पदयात्रा होणार आहे. मणीभवन ते ऑगस्ट क्रांती मैदान ही पदयात्रा असणार आहे. सकाळी साडेआठ वाजता मुंबईच्या मार्गावर राहुल गांधी यांची पदयात्रा सुरु होणार आहे. या पदयात्रेत सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी होणार आहेत. पदयात्रेनंतर तेजपाल सभागृहात सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांशी राहुल गांधी चर्चा करणार आहेत.

### भारत जोडो न्याय यात्रेच्या सभेचे पोस्टर लॉन्च

राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो न्याय यात्रे'ची रविवारी १७ मार्चला मुंबईत शिवाजी पार्कवर सायंकाळी पाच वाजता जाहीर सभेने सांगता होणार आहे. त्यादृष्टीने काँग्रेसने जोरदार तयारी सुरू केली असून या सभेच्या पोस्टरचे लॉन्चिंग आज येथे करण्यात आले.

---



## संगमेश्वर महाविद्यालयात युवतींना लाठी काठी प्रशिक्षण

✔ सोलापूर/प्रतिनिधी

राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची प्रेरणा घेऊन शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभाग यांच्या माध्यमातून संगमेश्वर महाविद्यालय येथे युवतींना मोफत लाठीकाठी प्रशिक्षण पार पडले. या ८ दिवसाच्या प्रशिक्षणामध्ये ५० युवतींचा सहभाग होता.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून चालू असलेल्या प्राचीन मर्दानी युद्धकलेविषयी आवड निर्माण करणे, विरवृत्ती निर्माण करणे आदी प्रामाणिक हेतू डोळ्यांसमोर ठेवून शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभाग यांच्या माध्यमातून प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. यावेळी डॉ.साखरे, प्रशिक्षक मिनिष पुजारी, शिवसेवक मारुती सुरवसे, अभि पवार, ओम गुंड, स्वप्नील सवळगी, धुळोबा शेंडगे, इराण्णा मठपती, साक्षी लोकेकर, प्रवलिका उडता आदी उपस्थित होते.

# आचारसंहितेची घोषणा झाली तसं सगळच झालं सुनसान नेतेमंडळींच्या छबी दडविल्या; आता कसं सगळंचं नियमात!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीची घोषणा आज शनिवारी झाली. घोषणेवेळीच आचारसंहिता लागू होत असल्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजकुमार यांनी सांगितल्यानंत दुपारी तीन वाजलेपासूनच आदर्श आचारसंहितेचा अंमलबजावणी सुरु झाली. आचारसंहितेच्या घोषणेबरोबरच शासकीय कार्यालयांमधील वातावरण सुनसान झाले. भाजपा, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, माकप आदी सर्वच कार्यालयांसमोरच्या नेतेमंडळींच्या छबी दडविण्यासाठी अनेकांचे हात सरसावले. प्रत्येक कार्यालयांमध्ये आणि परिसरात एकच प्रतिक्रिया अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून मिळत होती... आता कसं सगळंचे नियमात !

२०२४ चा लोकसभा निवडणुकींचा कार्यक्रम आज घोषित होणार यासंबंधीची माहिती कालच शुक्रवारी निवडणूक आयोगाच्यावतीने देण्यात आली होती. त्यामुळे आदर्श आचारसंहितेच्या सावटाखाली जाणारी कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आजदेखील दुपारी दोन-अडीच वाजेपर्यंत सोलापूर शहरातील मुख्यत्वे, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, दक्षिण आणि उत्तर सोलापूर तहसीलदार आणि पंचायत समिती कार्यालये, भीमा कालवा मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरण आदी कार्यालयांबरोबरच जिल्ह्यातील निम शहरांमधील सर्व तहसीलदार कार्यालये, नगरपरिषद कार्यालये, पंचायत समिती कार्यालये या ठिकाणी फायली वेगाने फिरवून आचारसंहितेपूर्वी संबंधित फायलींना मंजूऱ्या घेऊन संबंधितांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

विशेषत्वे, आचारसंहितेच्या सावटाखाली विकास कामांच्या फायली जाऊ नये, याची दक्षता घेत संबंधित कार्यालयांचे वरिष्ठ अधिकारी तसेच कर्मचारी हे कार्यालयांमध्ये ठाण मांडून होते. काही कार्यालयांमध्ये तर फायलींना मॅरेथॉन मंजूरी देण्यात आली. जेव्हा दुपारचे तीन वाजले आणि देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजकुमार यांची पत्रकार परिषद सुरु झाली तेव्हा सर्वांची घाई थांबली. आचारसंहितेत फायली अडकू नये म्हणून यंत्रणा गतीमान केलेल्यांचे हात स्थिरावले. सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडत भोजनावर ताव मारला. फायलींना मंजूरी मिळविण्यासाठी जे प्रयत्न झाले, त्या प्रयत्नांचा चीज झाल्यांचा आनंद चेहऱ्यावर घेत सांयकाळी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कार्यालये सोडली.

दुसरीकडे आदर्श आचारसंहितेचे पालन करताना आपल्या पक्षाकडून कोणताही नियम भंग होणार नाही, याची दक्षता घेण्यासंदर्भात पक्षाचे अध्यक्ष, पदाधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे पक्ष कार्यालयामध्ये आज दुपारी तीन वाजण्याच्या दरम्यान हालचाली वाढल्या. पक्ष कार्यालयांसमोर जे फलक होते ते झाकण्यासाठी हात कार्यरत झाले.



सोलापूर : लोकसभा निवडणुकीची आचासंहिता लागल्यानंतर पक्ष कार्यालयासमोर फलकांवरील नेतेमंडळींच्या छबी झाकताना पक्षाचे कार्यकर्ते.

### आता सेकंड इनिंग निवडणूक आयोगाच्या कामांची जबाबदारी

कोणत्याही क्षणी लोकसभेची आचारसंहिता लागणार असे मानून सोलापूर शहरासह जिल्ह्यातील निम शहरांमधील सर्वच शासकीय कार्यालयांमध्ये फायलींना मंजूरी घेण्याचे जणू मिशन राबविले जात होते. अधिकारी तसेच कर्मचारी यांची यंत्रणा राबत होती. मात्र, आज प्रत्यक्ष आचारसंहिता लागल्याने कार्यालयांमधील काम पूर्णपणे ठप्प झाले. त्यानंतर आता सोलापूर आणि माढा या दोन लोकसभा मतदार संघासाठी ७ मे रोजी होणाऱ्या निवडणूक कार्यक्रमासाठी अधिकारी आणि कर्मचारी यांचे हात राबायला सुरवात होणार आहे. अधिकारी, कर्मचारी यांची सेकंड इनिंग म्हणजे निवडणूक आयोगाच्या कामांची जबाबदारी असणार आहे.

## चिपळुणात दोन अल्पवयीन शाळकरी मुलींचे मृतदेह सापडले

✔ चिपळूण/प्रतिनिधी

रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यात दोन अल्पवयीन विद्यार्थिनींचे मृतदेह मिळाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. चिपळूण तालुक्यात दसपटी विभागात हा सगळा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सोनाली राजेंद्र निकम (वय-१४) आणि मधुरा लवेश जाधव (वय- १४ रा. कादवड) या मोहन विद्यालय, अकले शाळेच्या इयत्ता नववीतील विद्यार्थिनी आहेत. त्यांचे मृतदेह नदी लगत सापडल्याने दसपटी विभागात एकच खळबळ उडाली आहे.

चिपळूण तालुक्यातील दसपटी विभागात कादवड येथे वैतरणा नदीलगत दोन शाळकरी मुलींचे मृतदेह मिळाले आहेत. या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे. या मुलींचा घातपात झाला किंवा कसे याबाबत चिपळूण पोलीस तपास करत आहेत. या दोन्ही शाळकरी मुलींचे मृतदेह कामथे येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.कातकरी समाजातील या गरीब कुटुंबातील मुली असून त्यांच्या मृत्यूबाबत घातपाताचा संशय व्यक्त होत आहे. आज (१६ मार्च) दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास कादवड वैतरणा नदीतील एका डोहाजवळ त्यांचे मृतदेह आढळून आले. यानंतर तेथील ग्रामस्थांनी तात्काळ शिरगाव पोलिसांना खबर दिली. पोलीस दाखल होताच त्यांनी तात्काळ दादर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन्ही मृतदेह आणले. दादर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदनासाठी दोन्ही मृतदेह कामथे येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. याप्रकरणी अधिक तपास चिपळूण पोलीस करत आहेत.